महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ १२ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २२७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### महागड्या घरांची सोडत सर्वसामान्यांची कोंडी

मुंबई महानगरपालिकेच्या घरांची अलीकडील सोडत ही केवळ एक आकडेवारीची बातमी न राहता, शहरी गृहनिर्माण धोरणातील गंभीर विसंगती उघड करणारी ठरली आहे. ४२६ घरांसाठी काढलेल्या सोडतीत तब्बल ९६ विजेत्यांनी घरे स्वीकारण्यास नकार दिला, तर आधीच ५३ घरांना शून्य प्रतिसाद मिळाला होता. म्हणजेच, "घर मिळालं" ही आनंदाची बाब न ठरता, "घर परवडत नाही" ही कडवी वस्तुस्थिती पुन्हा एकदा समोर आली आहे. या घरांची किंमत भांडूपमध्ये ६६ लाखांहून अधिक, तर भायखळ्यात एक कोटींहून अधिक आहे. दुसरीकडे, अर्जदारांची उत्पन्न मर्यादा आणि कर्जक्षमतेचा विचार केला, तर ही घरे कागदावर जरी "परवडणारी" दाखवली जात असली, तरी प्रत्यक्षात ती सर्वसामान्य मध्यमवर्गासाठी आवाक्याबाहेरचीच आहेत. त्यामुळेच विजेता ठरूनही अनेकांनी घरे सरेंडर केली, यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. महत्त्वाचं म्हणजे ही समस्या केवळ मुंबईपुरती मर्यादित नाही. कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर तसेच ठाणे जिल्ह्यातील इतर शहरांमधील महाडा, महापालिका किंवा विशेष गृहनिर्माण योजनांमधील घरेही याच संकटाला सामोरी जात आहेत. "परवडणारी घरे" या नावाखाली उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पांची किंमत इतकी जास्त असते की, प्रत्यक्ष लाभार्थी असलेला सर्वसामान्य नोकरदार, कामगार किंवा निम्न-मध्यमवर्गीय कुटुंब त्या घरांपासून दूरच राहते.

यामागे प्रश्न आहे तो धोरणांचा. विकास नियंत्रण नियमावली, वाढती बांधकाम खर्च, भूखंडांचे दर, आणि त्यावर लादले जाणारे विविध कर – या सगळ्यांचा भार अखेरीस घर खरेदीदारावरच येतो. परिणामी, योजना राबवली जाते, सोडत काढली जाते, पण घरे रिक्त राहतात. हे केवळ आर्थिक नुकसान नाही, तर गृहनिर्माण व्यवस्थेचं अपयशही आहे. आज गरज आहे ती उत्पन्न मर्यादा आणि घरांच्या किंमती यामध्ये वास्तववादी सुसंगती आणण्याची. मुंबई, ठाणे जिल्हा आणि आसपासच्या शहरांमध्ये काम करणाऱ्या सामान्य कुटुंबांच्या प्रत्यक्ष उत्पन्नाचा, कर्जक्षमतेचा आणि जीवनावश्यक खर्चाचा अभ्यास करूनच घरांच्या किंमती ठरवायला हव्यात. अन्यथा, सोडती कागदावर यशस्वी होतील, पण जमिनीवर मात्र "रिक्त घरांची संख्या" वाढतच जाईल. घर ही लक्झरी नव्हे, तर मूलभूत गरज आहे. ती गरज पूर्ण करणाऱ्या योजना जरच सर्वसामान्यांपर्यंत पोहोचल्या, तरच अशा सोडतींचं खरं यश मोजता येईल. अन्यथा, मुंबई असो वा कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ-बदलापूर असो – सर्वत्र घरं आहेत, पण ती घ्यायला माणसं नाहीत; असंच चित्र राहील

# मुंबईत ४४ वर्षांनंतर भाजपचा महापौर!

## रितू तावडे महापौरपदी तर संजय घाडी उपमहापौरपदी विराजमान

**मुंबईचा महापौर आणि उपमहापौरांच्या निवडणुकीच्या निमित्ताने महापालिका मुख्यालय गजबजले होते. निवडणुकीची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी महापालिका सभागृहात भाजप - शिवसेना (शिंदे) महायुती आणि शिवसेना (ठाकरे) मनसे नगरसेवक आमनेसमाने आहे. त्यामुळे उभयतांनी घोषणाबाजी करीत सभागृह दणाणून सोडले. भाजप आणि शिवसेनेच्या (शिंदे) नगरसेवकांनी मोदी नामाचा गजर करीतच सभागृहात प्रवेश केला. जय श्रीराम, जय भवानी, जय शिवाजी, सियावर रामचंद्र की जय, मोदी... मोदी..., देवाभाऊ... देवाभाऊ अशा घोषणा देत भाजप नगरसेवकांनी सभागृह दणाणून सोडले. उपमहापौरांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू होताच सभागृहात पन्नास खोके, एकदम ओके, गद्दार... गद्दार... अशी घोषणाबाजी करीत शिवसेनेच्या (ठाकरे) नगरसेवकांनी सभागृह दणाणून सोडला. मावळत्या महापौरांऐवजी महापालिका आयुक्त भूषण गगराणी सभागृहाच्या पिठासीन अधिकारी पदावर विराजमान झाले होते. त्याबद्दल शिवसेनेच्या (ठाकरे) गटनेत्या किशोरी पेडणेकर यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.**



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ११**

**मुंबई : देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेवर अखेर भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) महायुतीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. भारतीय जनता पक्षाच्या रितू तावडे यांची मुंबईच्या महापौरपदी, तर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाचे संजय घाडी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीमुळे भाजपने तब्बल ४४ वर्षांनंतर मुंबई महापालिकेचे महापौरपद आपल्याकडे खेचून आणले आहे.**

मुंबई महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पडली होती. भाजपकडून रितू तावडे, तर शिंदे गटाकडून संजय घाडी यांनीच अर्ज दाखल केले होते. विरोधी पक्षांनी उमेदवार न उभा केल्याने ही निवड प्रक्रिया बिनविरोध पार पडली. त्यानंतर ११ फेब्रुवारी रोजी अधिकृतपणे या नावांची घोषणा करण्यात आली.

**■ कोण आहेत रितू तावडे?**

रितू तावडे या भाजपच्या मुंबईतील एक आक्रमक आणि अनुभवी नेत्या म्हणून ओळखल्या जातात. २०१२ मध्ये घाटकोपर प्रभाग क्रमांक १२१ मधून त्यांनी पहिल्यांदा निवडणूक लढवली आणि त्या निवडूनही आल्या. त्यानंतर २०१७ मध्ये प्रभाग क्रमांक १२७ मधून त्यांनी विजय मिळवला. २०२६ च्या निवडणुकीत त्यांनी प्रभाग क्रमांक १३२ मधून विजय मिळवला आहे. यापूर्वी त्यांनी मुंबई महापालिकेच्या शिक्षण समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही सांभाळली आहे. ५३ वर्षीय रितू तावडे यांनी निवडणुकीसाठी दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये त्यांचे शिक्षण १२वी पर्यंत झाल्याचं नमूद केले आहे.

१९९३ साली आचार्य मराठे कॉलेजमधून त्यांनी इयत्ता बारावीचे शिक्षण पूर्ण केले आहे. विद्याविहारच्या रहिवासी असलेल्या रितू तावडे या व्यापार क्षेत्रामध्ये कार्यरत असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे १९९७–९८ पासून ते २०२२ या कालावधीत शिवसेनेच्या (अखंड) सलग पाच महिला महापौर झाल्या आहेत. तर २०२६ मध्ये महापौरपदासाठी खुला वर्ग महिला आरक्षण असल्याने भाजपच्या रितू तावडे यांना महापौरपदाची संधी देण्यात आली आहे. मुंबई महापालिकेच्या महापौरपदावर महिलांनी विविध कालखंडात प्रभावी नेतृत्व दिले आहे. १९५५–५६ मध्ये सुलोचना मोदी यांनी या परंपरेची सुरुवात केली. त्यानंतर १९९४–९५ मध्ये ॲड. निर्मला सामंत प्रभावळकर, १९९७–९८ मध्ये विशाखा राऊत, २००७–०९ मध्ये डॉ. शुभा राऊळ, २००९–१२ मध्ये श्रद्धा जाधव, २०१४–१७ मध्ये स्नेहल आंबेकर आणि २०१९–२२ मध्ये किशोरी पेडणेकर यांनी महापौरपद भूषवले. आता २०२६ मध्ये रितू तावडे यांच्या निवडीमुळे ही महिलांच्या नेतृत्वाची परंपरा पुढे सुरू राहिली आहे.



# बांधकामासाठी 'एनए'ची अट रद्द !

## महसूल विभागाचा मोठा निर्णय

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ११**

**मुंबई :** शेतीच्या जमिनीवर घर किंवा अन्य बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून घ्यावी लागणारी अकृषिक (एनए) परवानगी रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. यापुढे बांधकाम आराखडा मंजूर झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र 'एनए' परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत महत्त्वाची सुधारणा करणारा शासननिर्णय तसेच राजपत्र जाहीर करण्यात आले आहे.

जमीन महसूल संहितेतील नव्या सुधारणेनुसार शेतजमिनीवर बांधकामासाठी नगर रचना विभाग तसेच स्थानिक प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा मंजुरी हीच आता 'एनए' परवानगी म्हणून ग्राह्य धरली जाणार आहे.

**■ नागरिकांची फेरी कमी होणार**

आतापर्यंत नागरिकांना नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम नकाशाला मंजुरी घेतल्यानंतर पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांकडे अकृषिक परवानगीसाठी चकरा माराव्या लागत होत्या. नव्या नियमानुसार, जर एखाद्या जमिनीचा वापर विकास आराखड्यानुसार अनुज्ञेय असेल, तर नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच 'अकृषिक परवानगी' मानली जाईल. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची स्वतंत्र परवानगी किंवा सनद आवश्यक राहणार नाही. या निर्णयामुळे बांधकाम प्रक्रियेतील विलंब कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## पद्मभूषण पुरस्काराबद्दल माजी राज्यपालांचे ठाण्यात अभिनंदन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ११**

**ठाणे :** महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची आज ठाणे येथील शासकीय विश्रामगृहात सदिच्छा भेट घेण्यात आली. भारत सरकारतर्फे त्यांना जाहीर झालेल्या प्रतिष्ठेच्या पद्मभूषण पुरस्काराबद्दल आमदार किसन कथोरे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले तसेच पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी आमदार निरंजन डावखरे हे देखील उपस्थित होते. राज्यपाल म्हणून कार्यरत असताना मा. कोश्यारी यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनातील सेवाभावी कार्याचा गौरव म्हणून जाहीर झालेला पद्मभूषण पुरस्कार हा संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद असल्याचे यावेळी आमदारांनी सांगितले.

**■ विविध विषयांवर मनमोकळा संवाद**

या सदिच्छा भेटीदरम्यान विविध विषयांवर मनमोकळा संवाद झाला. मा. कोश्यारी यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य व यश लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

**"आम्ही एनडीएमध्ये आहोत आणि एनडीएतच राहणार!"**

# आता विलीनीकरण नाही ?

## पक्षाचा निर्णय सामुदायिक — सुनील तटकरे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ११**

**मुंबई :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बारामती विमान अपघातात (Learjet ४५) निधन झाले, असा विश्वासू अहवाल आणि सरकारी माहिती उपलब्ध आहे, ज्यात त्यांच्या सोबत परेलिक, पायलट व इतर कर्मचारी यांचाही समावेश होता. हा अपघात २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळाजवळ झाला आणि त्यानंतर त्यांच्या पार्थिवाचा भावनिक राजकीय आणि सामाजिक कार्यक्रमात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अकाली निधनानंतर सुनेत्रा पवार, त्या राज्यसभा सदस्य आणि अजित पवार यांच्या पत्नी, यांना उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी दिली गेली आणि त्यांनी ३१ जानेवारी रोजी पदभार स्वीकारला.

**आम्ही एनडीएमध्ये आहोत. दादा असतानाच मी वारंवार भूमिका स्पष्ट केली की, आम्ही दादांच्या नेतृत्वाखाली सामूहिकरित्या एनडीए सोबत जाण्याचा निर्णय घेतला. तो कालही होता, आजही आहे आणि उद्या भविष्यामध्येही राहिल. त्यामुळे एनडीएमध्ये येण्याबाबतची स्पष्टता कोणीतरी करणे आवश्यक आहे, असे तटकरे म्हणाले.**



काल पदभार स्वीकारल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी दिल्लीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आगामी राजकीय धोरणांबाबत आणि पक्षाच्या आगामी निर्णयांबाबत चर्चा झाल्याचे वृत्त आहे. दरम्यान, या भेटीचे राजकीय स्त्रोतांमध्ये वेगवेगळे अर्थ लावले जात आहेत कारण सध्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विभाजित गटांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा जोर धरत आहे आणि संभाव्य राजकीय समीकरणांवर रणनीती ठरवली जात आहे.

राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते सुनील तटकरे यांनी याबाबत महत्त्वाचे भाष्य केले असून, काही आरोपांवर त्यांनी स्पष्ट सांगितले की सुनेत्रा पवार यांचा निर्णय उपमुख्यमंत्रीपदासाठी पूर्णपणे स्वेच्छेने झाला, यामध्ये कोणत्याही बाह्य दबावाचा समावेश नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. राजकारणात सध्या पक्षाचे भवितव्य, संभाव्य राजकीय एकत्रीकरण आणि पुढील नेतृत्वाबाबत चर्चा सुरू आहे आणि या सर्व घडामोडी महाराष्ट्रातील राजकीय परिसंस्थेवर प्रभाव पाडत आहेत.




## थोडक्यात महत्त्वाचे




### उल्हासनगरच्या महापौरांना अद्याप हक्काचे दालन नाही !

**प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर सवाल?**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**उल्हासनगर :** महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर महापौरांची निवड होऊनही त्यांना अद्याप हक्काचे अधिकृत दालन उपलब्ध झालेले नाही. प्रशासनाच्या नियोजनशून्य आणि संथ कारभारामुळे महापौर अश्विनी निकम यांना सध्या स्थायी समिती सभापतींच्या कार्यालयातून कामकाज करावे लागत आहे. निवडणुकांपूर्वीच महापौर दालनाची दुरुस्ती पूर्ण होणे अपेक्षित असताना, निवडीनंतरही काम अपूर्ण राहिल्याने प्रशासनावर टीका होत आहे.

उल्हासनगर महापालिका निवडणुका जाहीर झाल्यानंतर महासभागृह तसेच महापौर व उपमहापौर दालनांच्या दुरुस्तीची जबाबदारी बांधकाम विभाग आणि आयुक्तांवर असते. मात्र प्रत्यक्ष निवडीच्या आदल्या रात्रीपर्यंत महासभागृहाचे काम रखडलेले होते. निवडीनंतर उपमहापौरांचे दालन पूर्ण करण्यात आले असले तरी महापौरांच्या कार्यालयाचे काम अद्याप अपूर्ण आहे. त्यामुळे महापौर अश्विनी निकम यांना अधिकृत दालन मिळालेले नाही. महापौर दालनाच्या दुरुस्तीचे काम सुरू असल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात कामाचा वेग अत्यंत मंद आहे. महापालिका बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता निलेश शिरसाटे यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. मात्र उपअभियंता संदीप जाधव यांनी महापौर व उपमहापौर दालनांचे काम वेगात सुरू असून येत्या आठवड्यात ते पूर्ण होईल, अशी माहिती दिली.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत

# शर्मिला पिंपळोलकरांनी स्वीकारला महापौरपदाचा पदभार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ११**

**ठाणे :** आठ दिवसांपूर्वी म्हणजेच ३ फेब्रुवारी रोजी झालेल्या ठाणे महापालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या नगरसेविका शर्मिला पिंपळोलकर यांची महापौरपदी, तर भाजपचे नगरसेवक कृष्णा पाटील यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली होती. या निवडीनंतर उपमहापौर पाटील यांनी तात्काळ कार्यालयात जाऊन पदभार स्वीकारला होता.

मात्र, महापौर पिंपळोलकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीतच पदभार स्वीकारणार असल्याची चर्चा सुरू होती. दरम्यान,



बुधवारी उपमुख्यमंत्री शिंदे हे ठाणे महापालिकेच्या मुख्यालयात दाखल होताच, त्यांच्या उपस्थितीतच शर्मिला पिंपळोलकर यांनी महापौरपदाचा पदभार औपचारिकरित्या स्वीकारला. या वेळी महापालिकेतील सत्ताधारी पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक आणि अधिकारी उपस्थित होते. ठाणे महापालिकेची पंचवार्षिक मुदत ६ मार्च २०२२ रोजी संपुष्टात आली होती. त्यानंतर महापालिकेत प्रशासकीय राजवट लागू होती. या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) ७५, भाजप २८, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) १२, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) ९, एमआयएम ५, शिवसेना (उबाठा) १ आणि अपक्ष १ असे एकूण १३१ नगरसेवक निवडून आले आहेत.

महापौरपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर आता ठाणे महापालिकेच्या कारभाराला वेग येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, सत्ताधारी युतीकडून विकासकामांना प्राधान्य देण्याचे संकेत देण्यात आले आहेत.



# झेडपी हस्तक्षेपामुळे शहापूरातील शाळांमध्ये उजेड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शहापूर तालुक्यातील 'खरम्याचा पाडा, या शाळेचे पंधराशे रुपये लाईटबील न भरल्याने गेल्या१वर्षापासून शाळा अंधारात?अशा मथळ्याखाली पत्रकार संजय कांबळे यांनी इलेक्ट्रॉनिक्स व प्रिंड मिडियावर प्रसिद्ध करताच याची दखल ठाणे जिल्हा परिषदेचे संवेदनशील उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)प्रमोद काळे यांनी घेऊन याबाबत तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना ग्रामपंचायतीला दिल्याने या परिसरातील सर्व शाळांचे थकित लाईटबील कळंमगाव ग्रामपंचायतीने नुकतेच भरले असल्याने आता गोरगरीब विद्यार्थ्यांच्या आयुष्यात'प्रकाश, पडणार आहे, त्यामुळे' देर आये दुरुस्त आये,असे म्हणून ठाणे जिल्हा परिषदेचे, मनसेचे नेते अविनाश जाधव आणि पत्रकार संजय कांबळे यांचे या परिसरातील सामाजिक कार्यकर्ते स्वप्रील लाखे यांनी आभार मानले आहे.






मनसेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव यांच्या कडे जिल्ह्यातील अनेक शाळांच्या दुरावस्थेबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, त्यानिमित्तानं शहापूर तालुका अध्यक्ष शैलेश बिडवी यांच्या सह तालुक्यातील 'खरम्याचा पाडा,या शाळेस त्यांनी भेट दिली असता ही शाळा केवळ १५०० रुपये लाईटबील थकल्याने गेल्या वर्षभर अंधारात असल्याचे समोर आले. ही शाळा५वी पर्यंत असून ३९ पटसंख्या आहे. शाळेस कोणीतरी टिव्ही दिला आहे. परंतु तो वर्षभर सुरू झालाच नाही, पंखे, कँम्युटर धूळखात पडले होते याबाबत अधिक माहिती घेतली असता असे समजले की, ग्रामपंचायत कळंमगाव अंतर्गत जिल्हा परिषद शाळा खरम्याचा पाडा, (१५००) रुपये, पेंढरी२ हजार ५१०, काणविंदे ,डोणेपाडा १६ शे १००,चिंचपाडा३हजार२ ४०,सखरोली १३ हजार ८१० रुपये अशा ८ ते ९ शाळांचे बील थकित आहे. याबाबत पत्रकार संजय कांबळे यांनी एस न्यूज महाराष्ट्र,दैनिक,ठाणे जीवनदिप वार्ता, लोकदिशा,व आपले नवनगर, इत्यादी इलेक्ट्रॉनिक्स व प्रिंट मिडियातून प्रसिद्ध करताच ठाणे जिल्हा परिषदेचे डेप्युटी सीईओ(ग्रामपंचायत) यांनी सीईओ रणजित यादव, अतिरिक्त सीईओ अजिंक्य पवार, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे मँडम,साप्रचे अविनाश फडतरे,यांच्या मार्गदर्शनाखाली शहापूर बिडिओ व कळंमगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामपंचायत अधिकारी सविता दाभाडे यांना निर्देश देऊन या बिलाबाबत कारवाई करण्याच्या सूचना दिल्या, त्यानुसार या परिसरातील सर्व झेडपी शाळांची लाईटबील भरले असल्याचे श्रीमती दाभाडे यांनी सांगितले. त्यामुळे'देर आये दुरुस्त आये, असे म्हणायला हरकत नाही, यामुळे या परिसरातील सामाजिक कार्यकर्ते स्वप्रील लाखे यांनी पत्रकार संजय कांबळे, ठाणे जिल्हा परिषद आणि मनसेचे अविनाश जाधव यांचे आभार मानले आहे.

महाराष्ट्र शासन

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कल्याण ता. कल्याण यांचे कार्यालय

### जाहिर नोटिस

**प्रति,**
**१) श्रीम. सिध्दी शरद सासे**
**रा.मु. भिसोळ, पो. रायते**
**ता. कल्याण, जि. ठाणे............................(अर्जदार)**
**विरुद्ध**
**२) निबंधक,जन्म मृत्यू नोंदणी विभाग,**
**ग्रुप ग्रामपंचायत आणे- भिसोळ**
**कल्याण .......................................सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणेः

उपरोक्त अर्जदार श्रीम. सिध्दी शरद सासे यांचा जन्म दिनांक १९/०८/२००५ भिसोळ जि. ठाणे.येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्माची नोंद, निबंधक, जन्म/मृत्यु नोंदणी विभाग,ग्रुप ग्रामपंचायत आणे- भिसोळ दफ्तरी करुन जन्माचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.

उशीरा जन्म/मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दि.०८/०७/२०२५ दाखल केला आहे.

सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार श्रीम. सिध्दी शरद सासे यांना सदर कार्यालयातर्फे यांचा जन्म दिनांक १९/०८/२००५ नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे ३०/०१/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

**सही /–**
**(विकास गारुडकर)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कल्याण**

**जा.क्र.फोजदारी/जन्म मृत्यू नोंद /टे-०६/कावि ४०६/२०२५**
**दि. ३०/०१/२०२६**

# राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिरात आरोग्य तपासणी व मार्गदर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : शिवाजीराव एस. जोंधळे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आसनगांव या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने आयोजित सरळांबे येथे निवासी शिबिरावेळी अघई प्राथमिक आरोग्य विभाग सहकार्याने येथील ग्रामस्थांसाठी आरोग्य तपासणी करून मार्गदर्शन करण्यात आले.

शिवाजीराव एस.जोंधळे या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग वतीने नंदनवन वानप्रस्थ उपासना क्षेत्र, श्री नामदेव महाराज कीर्तन विद्यालय, सरलांबे येथे 05 ते 11 फेब्रुवारी या कालावधीत सात दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर, शिबिरात विविध उपक्रम राबविण्यात आले. तसेच या निमित्ताने अघई आरोग्य विभाग यांच्या सहकार्याने आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. रुपाली शेडगे यांच्यासह डॉ. वैष्णवी पाटील, डॉ. माधुरी ठाकरे आरोग्य सेवक सचिन चंदे, गजानन जाधव आदी पथकाने ग्रामस्थांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब व मधुमेह




तपासणी करून यासोबतच सिकल सेल आजाराबाबत तपासणी व जनजागृती करण्यात आली. तसेच अनेक नागरिकांना सिकल सेल आजाराची माहिती नसल्यामुळे या शिबिराच्या माध्यमातून आजाराची लक्षणे, तपासणीचे महत्त्व तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

दरम्यान, या उपक्रमात स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग घेत ग्रामस्थांना आरोग्य तपासणीसाठी प्रोत्साहित केले. तर या शिबिरामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढली असून, वेळेवर तपासणी केल्यास आजार गंभीर होण्यापासून कसा टाळता येतो याबाबत सकारात्मक संदेश मिळाला असल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. रुपाली शेडगे यांनी म्हटले. तसेच या शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेची "सेवेसाठी शिक्षण आणि शिक्षणातून सेवा" या ब्रीदवाक्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्याचे दिसून आले. त्याचबरोबर ग्रामस्थांनी या आरोग्य तपासणी शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घेतला असून अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना निरोगी राहण्यास निश्चितच मदत होईल, असे मत जोंधळे इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ. गीथा के. जयराज यांनी शिबिराला भेट देऊन व्यक्त केले. या उपक्रमाच्या आयोजन व यशस्वीतेसाठी प्रा. एकनाथ राठोड, प्रा.पद्मिनी कनान यांनी परिश्रम घेतले.

# मुंबई–गोवा महामार्गावर ट्रेलर अपघात

## मोठी दुर्घटना टळली





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : मुंबई–गोवा महामार्गावरील पेण नजीक तरणखोप ब्रिजवर लोखंडी कॉइल वाहून नेणाऱ्या दोन ट्रेलरमध्ये भीषण अपघात झाला. या घटनेत सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अपघातामुळे काही काळ महामार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, पेण–पनवेलच्या दिशेने जाणारा एक ट्रेलर काही कारणास्तव ब्रिजवर थांबलेला होता. त्याचवेळी मागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रेलरचा वेग नियंत्रणाबाहेर गेल्याने त्याने थांबलेल्या ट्रेलरला जोरदार धडक दिली. या अपघातात धडक देणाऱ्या ट्रेलरच्या चालकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमी चालकाला तात्काळ बाहेर काढून पेण सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.घटनेची माहिती मिळताच पेण उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल आणि पोलिस निरीक्षक संदीप बागुल बचाव पथकासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करत अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या कडेला हलविण्याची कार्यवाही केली. या प्रकरणाचा पुढील तपास पेण पोलिसांकडून सुरू आहे.

# रायगडमध्ये 14 फेब्रुवारीला शासकीय योजनांचा महामेळावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : सर्वोच्च न्यायालय आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत 14 फेब्रुवारी 2026 रोजी अलिबाग येथील कुरूळ येथील आरसीएफ हॉल येथे भव्य 'विधी सेवा शिबिर व विविध शासकीय योजनांचा महामेळावा' आयोजित करण्यात आला आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या महामेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे आणि त्यांना योजनांचा थेट लाभ मिळवून देणे हे आहे. जिल्हा प्रशासन, जिल्हा न्यायालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडणार असून, कार्यक्रमात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत, जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलिस अधीक्षक आँचल दलाल आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. महामेळाव्यात विविध शासकीय विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. आरोग्य, शिक्षण, कृषी, समाजकल्याण, महिला व बालविकास, मत्स्यव्यवसाय, आदिवासी विकास, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ), तसेच एसटी महामंडळ आदी विभागांमार्फत योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, केवळ माहितीपुरते न राहता पात्र लाभार्थ्यांचे अर्ज जागीच भरून घेण्याची आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला देण्यात येणार असून, विविध कायदेशीर हक्क, सरकारी योजना, तसेच न्यायालयीन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले जाईल. याशिवाय, निवडक लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात योजनांच्या लाभांचे वाटपही करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात निवडणूक विभागाचाही स्टॉल असणार असून, नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीत दुरुस्ती तसेच निवडणूक प्रक्रियेबाबत जनजागृती केली जाणार आहे. त्यामुळे युवक व नवमतदारांसाठी ही संधी उपयुक्त ठरणार आहे. पत्रकार परिषदेत अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील यांचीही प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा प्रशासनातील सर्व विभागांनी एकत्र येऊन नागरिकांच्या दारी शासनाच्या योजना पोहोचवण्याचा हा प्रयत्न असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू जनतेला, या महामेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांचा तसेच मोफत विधी सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# पडघा खडवली रस्त्यावर खड्डयाची मालीका

## सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या व मध्य रेल्वेच्या खडवली स्टेशनकडे जाणाऱ्या पडघा खडवली मार्गावर खड्डयाचीं मालीका सुरू असुन रस्त्याकडे भिवंडी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अक्षरशः दुर्लक्ष होत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेला पडघा-खडवली हा रस्ता खुप महत्वाचा मानला जातो. या रस्त्यावरुन खडवली स्टेशनमार्गे मुंबई उपनगरात जाण्यासाठी हजारो चाकरमानी, रोजंदारी कामगार, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी,शिक्षक, महीला,व्यावसायिक, दुकानदार दररोज या रस्त्यावरून दिवस





रात्र खाजगी चारचाकी, दुचाकी, मालवाहू ट्रक, प्रवाशी बस रिक्षेने प्रवास करीत असतात तर या रस्त्यालगत असलेल्या गावांमध्ये व मुंबई नाशीक महामार्गावरून टिटवाळा, गोवेली, मुरबाड, बदलापूर अंबरनाथ, कर्जत, माळशेज घाट येथे जाण्यासाठी या मार्गाचा वापर होत असल्याने हा रस्ता दळण वळणाच्या दृष्टीने खुप महत्त्वाचा मानला जातो मात्र सोर,आन्हे,आन्हे- पाडा गावाच्या हद्दीतील रस्त्यावर मोठे खड्डे पडले असुन रस्त्यावरील डांबर निघुन खडी, दगड, माती वर आलेलीआहे तसेच गतीरोधकाच्या दोन्ही बाजुला खड्डे पडले आहेत त्यामुळे वाहनचालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत. आहे तर रात्रीच्या वेळी वाहन चालवताना जिव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याचे वाहनचालकाचे म्हणणे असुन रात्रीच्या वेळी खड्डयात वाहने आपटून अपघात होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग भिवंडी यांनी वेळीच लक्ष घालून पडघा - खडवली रस्ता दुरुस्त करण्याची मागणी वाहनचालकांनी केली आहे. तसेच तात्काळ रस्त्याची दुरूस्ती न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा कै. भारत पाटील रिक्षा चालक मालक संघटनेचे उपाध्यक्ष अशोक पाटील यांनी दिला आहे.

# आत्मा मलिक शैक्षणिक व क्रीडा संकुलात स्नेहसंमेलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : आत्मा मलिक शैक्षणिक व क्रीडा संकुल, मोहिली–अघई संचालित इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, नाट्य सादरीकरण तसेच विविध सांस्कृतिक व मनोरंजनपर कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारा हा कार्यक्रम अत्यंत रंगतदार ठरला. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने प्राध्यापक, विद्यार्थी




व माजी विद्यार्थी यांच्यातील आपुलकीचे व मैत्रीपूर्ण नाते अधिक दृढ झाले. अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक व सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व संस्थेच्या वतीने अधोरेखित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे यांनी शारीरिक शिक्षण व खेळाचे जीवनातील महत्त्व विशद करुन मार्गदर्शन केले तर ध्यानधारणेद्वारे ताण-तणाव व्यवस्थापन करून जीवन अधिक सुखी व समृद्ध करण्याचा मूलमंत्र संस्थेचे कार्याध्यक्ष उमेश जाधव यांनी उपस्थितांना दिला. प्राचार्या डॉ. आरती कारंडे यांनी संस्थेच्या वार्षिक अहवालाचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठ सेनेट सदस्य प्रा. विश्वंभर जाधव, सुप्रसिद्ध सिने-नाट्य कलाकार किरण शेवदे, संस्थेचे कार्याध्यक्ष उमेश जाधव, प्राचार्या डॉ. आरती कारंडे, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी, विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर स्नेहसंमेलन यशस्वी होण्यासाठी आयोजन समिती, प्राध्यापक तसेच विद्यार्थी, स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले होते.

# भविष्यवेध



गुरुवार
१२ फेब्रुवारी २०२६

**मेष**
आवश्यक गोष्टी व्यवस्थित ठेवा जेणेकरून गरज पडल्यास तुम्हाला कोणाकडेही मागावे लागणार नाही. कौटुंबिक जीवनात सुसंवाद राहील.

**वृषभ**
एखादे काम पूर्ण करण्यासाठी नवीन पद्धती वापरून पाहू शकता. ऑफिसमध्ये सहकाऱ्यांसोबत नवीन प्रकल्पावर चर्चा करू शकता. कंपनीला फायदा होईल.

**मिथुन**
कुटुंबासोबत आनंदात वेळ घालवण्याचा अनुभव खुप छान असेल. कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण होईल. प्रलंबित कामे पूर्ण कराल.

**कर्क**
नवीन ध्येयेही निश्चित कराल. जर इतरांवर अवलंबून राहण्याऐवजी मेहनतीवर आणि क्षमतेवर विश्वास ठेवलात तर गोष्टी सुरळीत होतील.

**सिंह**
जोडीदारासोबत चित्रपट पाहण्याची योजना कराल, ज्यामुळे नाते सुधारेल. व्यवसाय सुरळीत सुरू राहतील आणि जुन्या ग्राहकांकडून आर्थिक नफा मिळेल.

**कन्या**
दिवसाच्या सुरुवातीला काही गोंधळ होऊ शकतो, परंतु कुटुंबाच्या मदतीने सर्वकाही सोडवले जाईल. योजनेवर काम केल्याने चांगले परिणाम मिळू शकतात.

**तुळ**
मेहनतीचे पूर्ण फळ तुम्हाला मिळेल आणि तुम्ही जे काही हाती घ्याल ते यशस्वी होईल. तुमच्या ड्रेसिंग सेन्सची ऑफिसमध्ये प्रशंसा होईल.

**वृश्चिक**
अभ्यासासाठी आणि करिअरसाठी अधिक मेहनत करण्याची आवश्यकता आहे.. कोणतेही काम हाती घेण्यापूर्वी, रोजगाराच्या संधी मिळतील.

**धनु**
परिश्रम आणि समर्पणाने एखादे काम लवकर पूर्ण कराल. भविष्यात तुम्हाला लक्षणीय आर्थिक लाभ होतील. तुमचे वैवाहिक जीवन आज आनंदी राहील.

**मकर**
बदलत्या हवामानात, आरोग्याची काळजी घ्या आणि तळलेले पदार्थ टाळा. ऑफिसमधील कर्मचाऱ्यांसोबत व्यवसायाबाबत बैठक घेऊ शकता.

**कुंभ**
कामाची गुणवत्ता सुधारण्यावर लक्ष केंद्रित करू शकता. कुटुंबासाठी वेळ काढल्याने नातेसंबंध मजबूत होतील आणि आनंदी वातावरण निर्माण होईल.

**मीन**
भविष्यासाठी नवीन ध्येये निश्चित कराल. वैवाहिक जीवन आज आनंदी राहील आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. नकारात्मक लोकांपासून अंतर ठेवा.

# खरीप हंगामाआधी खतांचा सुरक्षित साठा आवश्यक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता /**मुंबई, दि. 11 :** खरीप हंगामासाठी युरिया आणि डीएपीचा संरक्षित साठा ठेवण्याचे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. खरीप हंगाम 2026 मध्ये युरिया आणि डीएपी खतांचा संरक्षित साठा मंजूर करण्यासंदर्भात मंत्रालयात बैठक पार झाली. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी संभाव्य मागणी, पुरवठा साखळीतील अडचणी आणि शेतकऱ्यांना वेळेवर खत उपलब्ध होण्याची गरज यासंदर्भात सविस्तर आढावा घेतला. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, युरिया आणि डीएपी ही खते शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची व मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी आहेत. पेरणीच्या तसेच उभ्या पिकांना दुसरा हप्ता देण्याच्या काळात मागणी वाढते. रेल्वे वाहतूक, आवंटन, आयात किंवा उत्पादनातील तांत्रिक कारणांमुळे पुरवठा विस्कळीत झाला तर शेतकऱ्यांना फटका बसू शकतो. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत तुटवडा जाणवू नये, यासाठी आधीच संरक्षित साठा ठेवणे गरजेचे असल्याचे कृषीमंत्री भरणे यांनी सांगितले.जून-जुलै या उच्च मागणीच्या महिन्यांत पुरवठा कमी झाल्यास तुटवडा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक नियोजन करण्याचे निर्देश दिले. शेतकऱ्यांना योग्य वेळी खते मिळाली पाहिजेत, हीच शासनाची प्राथमिकता आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# मराठी भाषेच्या मुद्द्यावर महापौरांचे पहिलेच पत्र वादाच्या भोवऱ्यात



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भाईंदर : मिरा-भाईंदर महापालिकेवर मराठी महापौर द्यावा, या मागणीसाठी मराठी एकीकरण समितीने पुकारलेले आंदोलन सध्या थंडावले असले तरी हा मुद्दा आता थेट महापौरांच्या भूमिकेमुळे पुन्हा चर्चेत आला आहे. नुकताच पदभार स्वीकारल्यानंतर महापौरांनी प्रशासनाला दिलेल्या पहिल्याच सूचना पत्रकात मराठी भाषेची मोठ्या प्रमाणात चूक-चिरफाड झाल्याचे समोर आले असून, त्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.**

**मिरा-भाईंदर महापालिकेच्या महापौरपदी डिंपल मेहता यांची निवड झाली असून बुधवारी त्यांनी पदभार स्वीकारला. मेहता या अमराठी असल्याने त्यांच्या निवडीवर मराठी एकीकरण समितीने तीव्र आक्षेप नोंदवला होता. याबाबत भाजपविरोधात आंदोलनही उभारण्यात आले होते. मात्र पक्षाने आपल्या निर्णयावर ठाम राहिल्याने कालांतराने हे आंदोलन थंडावले.**

दरम्यान, पदभार स्वीकारल्यानंतर महापौरांनी महापालिका आयुक्तांना दिलेले पहिलेच पत्र समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या पत्रात शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधात कठोर कारवाईचे धोरण राबविण्याची मागणी करण्यात आली असली, तरी पत्रातील मराठी भाषेतील गंभीर त्रुटींमुळे महापौरांच्या भूमिकेवर आणि प्रशासनातील भाषिक संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच दिवशी महापौरांनी मराठीची गळचेपी करण्यास सुरुवात केल्याची संतप्त प्रतिक्रिया मराठी एकीकरण समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, सदर पत्र लिहिण्याच्या सूचना आपण शासकीय कर्मचाऱ्यांना दिल्या होत्या. त्यामुळे त्यात काही चुका झाल्या असतील तर त्याची पुन्हा एकदा शहानिशा केली जाईल, अशी प्रतिक्रिया महापौरांकडून देण्यात आली आहे.



# नवी मुंबई पोलिसांच्या सेवेत 'सजग ॲप'

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई : शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी गस्ती पोलिसांवर मोठी जबाबदारी असते. त्यांच्यासाठी सजग ॲप आणि डॅश कॅमेरा देण्याची सुरुवात करण्यात आली आहे. सध्या हे ॲप प्रायोगिक तत्त्वावर सुरू असून लवकरच पूर्ण क्षमतेने होणार आहे. शुक्रवारी झालेल्या वार्षिक पत्रकार परिषदेत पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी ही माहिती दिली. दरम्यान २०२५ मध्ये गुन्ह्यांची उकल होण्याचे प्रमाण ३ टक्क्यांनी वाढले असल्याचेही त्यांनी सांगितले.**

नवी मुंबई पोलिसांनी गस्त पोलीस सेवेचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून पोलिसांसाठी सजग ॲप आणि डॅश कॅमेरा दिला जात आहे. या शिवाय प्रायोगिक तत्त्वावर सजग ॲप हे स्मार्ट वाचप्रमाणे काम करणार आहे. गस्त पोलीस पथक ज्या-ज्या ठिकाणी गस्त घालण्यासाठी गेले, त्याची माहिती या ॲपद्वारे मिळते. या शिवाय गस्त घालत असताना कोण कुठे, किती वेळ थांबले याचीही माहिती साठवली जाते.

चारचाकी गाड्यांतूनही गस्त घालत असताना त्यांना डॅश कॅमेरा पुरवण्यात येत असून त्याद्वारे ज्या-ज्या ठिकाणी गस्त पथक गेले त्याचे चित्रीकरण करून ते जतन करण्यात येणार आहे. नवी मुंबई पोलिसांनी गस्त पोलीस सेवेचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून पोलिसांसाठी सजग ॲप आणि डॅश कॅमेरा दिला जात आहे. या शिवाय प्रायोगिक तत्त्वावर सजग ॲप हे स्मार्ट वाचप्रमाणे काम करणार आहे. स्त पोलीस पथक ज्या-ज्या ठिकाणी गस्त घालण्यासाठी गेले, त्याची माहिती या ॲपद्वारे मिळते. या शिवाय गस्त घालत असताना कोण कुठे, किती वेळ थांबले याचीही माहिती साठवली जाते. चारचाकी गाड्यांतूनही गस्त घालत असताना त्यांना डॅश कॅमेरा पुरवण्यात येत असून त्याद्वारे ज्या-ज्या ठिकाणी गस्त पथक गेले त्याचे चित्रीकरण करून ते जतन करण्यात येणार आहे. नवी मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्यांना आतापर्यंत दहा बॉडी वॉर्न कॅमेरे देण्यात आले आहेत. या बॉडी वॉर्न कॅमेऱ्यांची संख्या आणखी वाढवण्यात येणार आहे. बॉडी कॅमेऱ्यामुळे पोलिसांच्या कारवाईमध्ये पारदर्शकता राहणार आहे. सजग ॲपमुळे त्यात अजून सुधारणा होईल अशी आशा आयुक्त मिलिंद भारंबे यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, नवी मुंबई पोलिसांनी आयुक्तालय कार्यालयाच्या आवारात सीसीटीव्ही कमांड सेंटरची स्थापना केली आहे. तळ मजल्यावर हे काम सुरू असून पहिल्या मजल्यावर त्याचे प्रशिक्षण केंद्र आहे.

# प्रशासकीय काळातील कामकाजाची श्वेतपत्रिका काढण्यासाठी समिती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई:** नवी मुंबई महापालिका हद्दीतील गाव गावठाण आणि इतर सर्व गरजेपोटीच्या घरांना लावण्यात आलेली जाचक शास्ती रद्द करण्याची सूचना वनमंत्री गणेश नाईक यांनी नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर आणि गटनेत्यांना दिल्या आहेत. त्याचबरोबर मागील पाच ते सहा वर्षांमध्ये महापालिका प्रशासकीय कार्यकाळात झालेल्या कामकाजाबाबत श्वेतपत्रिका काढण्यासाठी समिती गठीत करण्याची सूचना देखील दिल्या आहेत.

वनमंत्री नाईक यांनी रविवारी नवनिर्वाचित महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, माजी महापौर आणि विद्यमान गटनेते सागर नाईक यांची बैठक घेतली. या बैठकीला माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक उपस्थित होते. वनमंत्री नाईक यांच्या नेतृत्वात नवी मुंबई महापालिका निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले असून ५ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या निवडणुकीमध्ये महापौरपदी सुजाता पाटील आणि उपमहापौरपदी दशरथ भगत यांची बिनविरोध निवड झालेली आहे. निवडीनंतर लगेचच जनहिताच्या आणि शहरी विकासाच्या दृष्टीने निर्णय घेण्याचे निर्देश नाईक यांनी पालिका पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. नवी मुंबईमध्ये गाव, गावठाण तसेच इतर गरजेपोटीची घरे बांधण्यात आली आहेत. त्याला प्रशासनाने तीनपट शास्ती आकारली आहे. ही शास्ती रद्द करण्याच्या अनुषंगाने महापालिकेच्या आगामी सर्वसाधारण सभेमध्ये पटलावर विषय घेण्यात येणार आहे. लोकप्रतिनिधी तसेच सभागृह अस्तित्वात येण्यापूर्वी मागील ५ ते ६ वर्षांमध्ये नवी मुंबई महापालिकेत प्रशासकीय कारभार सुरु होता.

## वाडा ग्रामीण रुग्णालयात

# महिला डॉक्टरांशी असभ्य वर्तन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ११**

**वाडा :** वाडा ग्रामीण रुग्णालयात श्रमजीवी संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षदा पाटील यांना आर्वाच्य भाषा, शिवीगाळ व असभ्य वर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून याबाबत वाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे. संबंधितांवर तातडीने कारवाई न झाल्यास कामबंद आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकारानंतर डॉ. हर्षदा पाटील यांनी तडकाफडकी राजीनामा दिल्याने ग्रामीण भागातील रुग्णसेवा ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वाडा ग्रामीण रुग्णालय प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी १० फेब्रुवारी रोजी दुपारी १२:३० ते १ या वेळेत गरोदर महिलांची सोनोग्राफी सुरू असताना सुमारे २० ते २५ महिला रांगेत होत्या. यादरम्यान काही महिलांनी आपला क्रमांक असतानाही इतरांना प्राधान्य दिल्याचा आरोप करत वाद घातला. मात्र, डॉ. हर्षदा पाटील यांनी कोणतीही पक्षपाती भूमिका घेतली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

दरम्यान, सोनोग्राफीसाठी आलेल्या एका गरोदर महिलेला अचानक चक्कर आल्याची घटना घडली. यावेळी श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी उपचारात हलगर्जीपणा झाल्याचा आरोप केला. मात्र, वैद्यकीय अधीक्षक यादव शेखरे यांनी हे आरोप फेटाळून लावत संबंधित महिलेला वेळेत व योग्य उपचार दिल्याचे स्पष्ट केले आहे. डॉक्टरांवरील दबाव आणि असभ्य वर्तनाच्या घटनांमुळे रुग्णसेवेवर परिणाम होण्याची भीती वैद्यकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

# कांदळवनाच्या कत्तलीवर उभारलेल्या अनधिकृत हॉटेलवर महापालिकेची कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ११**

**भाईंदर :** मिरा रोड परिसरात खाडी किनारी कांदळवनाची कत्तल करून उभारण्यात आलेल्या अनधिकृत हॉटेलच्या बांधकामावर अखेर महापालिकेने कारवाई केली आहे. मिरा रोड येथील सृष्टी भागात खाडी किनारी कांदळवन नष्ट करून रॉयल गार्डन हॉटेल उभारण्यात आल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र आक्षेप नोंदवला होता. यासंदर्भात महापालिका प्रशासनाकडे तक्रारी करूनही सुरुवातीला दुर्लक्ष झाल्याने काही नागरिकांनी थेट न्यायालयात धाव घेतली होती.



सुनावणीनंतर न्यायालयाने सदर अनधिकृत बांधकाम हटविण्याचे निर्देश महापालिकेला दिले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार मंगळवारी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाईची मोहीम राबविली. सहाय्यक आयुक्त नरेंद्र चव्हाण, प्रियंका भोसले आणि जितेंद्र कांबळे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. या वेळी प्रभाग समितीतील कर्मचारी, फेरीवाले पथक, पोलीस तसेच महापालिकेचे इतर कर्मचारी उपस्थित होते. जेसीबी आणि पोकलेन मशीनच्या सहाय्याने चार ठिकाणी बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली. या कारवाईत रॉयल फॅमिली गार्डन रेस्टॉरंट अँड बार, जाफर खाडी परिसरातील शेड व कुंपण, पुनम सागर कॉम्प्लेक्समधील पत्र्याचे गोडाऊन तसेच स्मशानभूमीमागील अनधिकृत बांधकामांचा समावेश आहे. कांदळवन नष्ट करून उभारलेल्या बांधकामांवर कठोर कारवाई करण्यात आल्याने पर्यावरणप्रेमी नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# स्वीकृत नगरसेवक निवडीतील वशिलेबाजीमुळे नवी मुंबईत असंतोष

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**तुर्भे, ता. ११ (बातमीदार)**

नवी मुंबई महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकपदासाठी सुरू असलेल्या प्रक्रियेत वशिलेबाजी, पक्षांतर्गत दबाव आणि अपारदर्शक कारभार होत असल्याचा दावा होत आहे. पात्र, अनुभवी आणि पक्षासाठी दीर्घकाळ काम केलेल्या कार्यकर्त्यांना डावलून राजकीय ओळखी, नातेसंबंध आणि वरदहस्त असलेल्यांना प्राधान्य दिले जात असल्याने शहरातील राजकीय वर्तुळात असंतोष पसरला आहे.

महापालिकेच्या नियमानुसार स्वीकृत नगरसेवकपदासाठी सामाजिक, शैक्षणिक, कायदेशीर व प्रशासकीय क्षेत्रातील तज्ज्ञांची निवड अपेक्षित असते, मात्र प्रत्यक्षात ही प्रक्रिया गुप्त, मनमानी आणि ठराविक व्यक्तींनाच लाभ होईल, अशा पद्धतीने राबवली जात असल्याचा दावा होत आहे.

**■ कार्यकर्त्यांमध्ये संताप**

निवडणुकीत प्रत्यक्ष मैदानात काम करणारे, पक्षवाढीसाठी झटणारे आणि जनतेशी थेट संपर्क असलेले कार्यकर्ते या प्रक्रियेत पूर्णतः दुर्लक्षित होत असल्याची भावना व्यक्त करत आहेत. निवडणुकीच्या वेळी रस्त्यावर उतरायचे आणि पद देताना मात्र ओळखी पाहायच्या का, असा सवाल अनेक कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे.

**■ लोकशाही मूल्यांना तडा**

स्वीकृत नगरसेवकपदाचा उद्देश तज्ज्ञ व्यक्तींमार्फत महापालिकेच्या कामकाजाला दिशा देणे हा असताना, या पदाचा वापर राजकीय उपकारफेड, समायोजन आणि सोयीसाठी केला जात असल्याचा दावा होत आहे. यामुळे लोकशाही मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून, प्रशासनाच्या विश्वासार्हतेवरही परिणाम होत आहे.

**■ पारदर्शकतेची मागणी**

या पार्श्वभूमीवर अनेक सामाजिक कार्यकर्ते व राजकीय निरीक्षकांनी स्वीकृत नगरसेवक निवड प्रक्रियेचे निकष जाहीर करावेत, अर्ज मागवावेत आणि पात्रतेच्या आधारेच निवड करावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

# स्मशानभूमींच्या रखडलेल्या कामावरुन नागरिकांचा संताप ठेकेदाराला 'ब्लॅक लिस्ट' करण्याची मनसेची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याणमधील बैलबाजार आणि लाल चौकी येथील स्मशानभूमींच्या पुनर्बांधणीचे काम गेल्या वर्षभरापासून रेंगाळल्याने नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. या गंभीर प्रश्नावर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली असून, निष्काळजी ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून जबाबदार अधिकाऱ्याला निलंबित करावे, अशी मागणी मनसेचे विभाग अध्यक्ष कपिल पवार यांनी केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बैलबाजार स्मशानभूमीच्या कामासाठी ५ फेब्रुवारी २०२५ रोजी निविदा काढण्यात आली होती. कंत्राटानुसार हे काम ३०० दिवसांत पूर्ण होणे बंधनकारक होते; मात्र फेब्रुवारी २०२६ उजाडले तरी नवीन स्ट्रक्चरचे काम सुरू झालेले नाही. ठेकेदाराने

केवळ जुने बांधकाम पाडून ठेवले असून, नवीन आराखड्याप्रमाणे कामाची एक वीटही रचली गेलेली नाही. यामुळे पावसाळ्यात आणि गर्दीच्या वेळी नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

मुंबई आणि डोंबिवलीच्या धर्तीवर या नवीन स्मशानभूमींमध्ये प्रदूषण नियंत्रणासाठी 'एक्झॉस्ट फॅन' आणि धूर उंचावर सोडण्याची आधुनिक यंत्रणा असणे अपेक्षित होते. मात्र, या कामाच्या मूळ टेंडरमध्ये अशा कोणत्याही तंत्रज्ञानाचा उल्लेख नसल्याने मनसेने प्रशासकीय नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आधुनिक सुविधेअभावी आजूबाजूच्या रहिवासी वस्तीला धुराचा त्रास सहन करावा लागत आहे. याला सर्वस्वी संबंधित अधिकारी व ठेकेदार जबाबदार आहे. त्यामुळे दोन्ही स्मशानभूमीची मुदत संपूनही काम पूर्ण झाल नसल्याने संबंधित ठेकेदारास काळे यादीत टाकण्यात यावे तसेच संबंधित अधिकाऱ्याने ठेकेदाराकडून वेळेत काम पुर्ण न करुन घेतल्याने संबंधित अधिकाऱ्याला देखील निलंबित करण्यात यावे. अन्यथा जन आंदोलन छेडण्याचा इशारा मनसेने दिला आहे.






# भिवंडीत पोलिसांच्या धडक कारवाईत साडेबारा लाखांचा एमडी जप्त,एकास अटक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी ( प्रतिनिधी ) :** भिवंडी तालुक्यात ठाणे ग्रामीण अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या कारवाईत एका आरोपीस ताब्यात घेत त्याच्या जवळून ५८ ग्रॅम वजनाचा ११ लाख ६० हजार रुपये किमतीचा एमडी हा अमलीपदार्थ जप्त करीत ,त्याच्या जवळील इतर मिळून १२ लाख ५२ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.याबाबत पोलिसांनी गुन्हा दाखल करून अटक केली आहे.



मोहम्मद परवेज उर्फ सुफियान मोहम्मद सुलतान अन्सारी (रा.भिवंडी) असे अटक आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेतील भिवंडी पथकातील पोलिस हवालदार हनुमान गायकर यांना मिळालेल्या माहितीनुसार एक संशयित अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येत भिवंडीतील पोगांव भागात येणार असल्याची माहिती मिळाली होती.त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश पाटील, पोलीस उपनिरीक्षक रोहन शेलार व पोलीस पथकातील हनुमान गायकर,उमेश ठाकरे, सुहास सोनवणे,आबिद अली सय्यद,जितेंद्र वारके,जयेश मुकादम यांनी पोगाव परिसरात सापळा रचून ही कारवाई केली असून त्याठिकाणी संशयित मोहम्मद परवेज उर्फ सुफियान अन्सारी येताच त्यास ताब्यात घेत झडती घेतली असता त्याच्या जवळ एमडी हा अंमली पदार्थ रोख रक्कम,मोबाईल,वजन काटा, असा मुद्देमाल ताब्यात घेत त्याविरोधात गुन्हा दाखल करीत अटक केली आहे.पुढील तपास तालुका पोलिस करीत आहेत.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# मनोर ग्रामपंचायत उपसरपंचपदी मंगेश गोंड विराजमान




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मंगेश गोंड यांची बहुमताने निवड झाली आहे. मनोर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदासाठी झालेल्या निवडणुकीत भाजपचे मंगेश गोंड यांना 17 पैकी 13 मते मिळून त्यांची बहुमताने निवड झाली आहे. गेल्या अनेक वर्षांनंतर मनोर येथील विकासासाठी शिवसेनेचे (शिंदे गट) जिल्हा प्रमुख वसंत चव्हाण, भाजपचे पदाधिकारी संतोष जनाठे, बहुजन विकास आघाडीचे प्रशांत घोसाळकर, मोमेज रईस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट ) साजित खतीब यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या निवडीत मंगेश गोंड यांची उपसरपंच पदी वर्णी लागली आहे.

सरपंच चेतन पाटील व ग्रामविकास अधिकारी नितीन पवार यांच्या देखरेखीखाली हि निवडणूक प्रक्रिया पार पडली. दरम्यान, शिवसेना, भाजप, बहुजन विकास आघाडी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे येऊन या उपसरपंच विराजमान पदाची जबाबदारी देण्यात आली असल्याचे संतोष जनाठे यांनी म्हटले.

# मीनाताई ठाकरे रंगायतन प्रकल्पात संथगती

## कंत्राटदाराला अंतिम इशारा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

आज दिनांक १०.०२.२०२६ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर (भा प्र से) यांनी स्व. मीनाताई ठाकरे रंगायतन येथील कामाची पाहणी केली. कंत्राटदाराच्या कामाची गती पाहता आयुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त करून कंत्राटदारास १० दिवसाची मुदत दिली आहे. या दिवसात जर कामात प्रगती न झाल्यास कार्यादेश रद्द करण्यात येईल अशी ताकीद दिली. तसेच शहर अभियंता यांनी दररोज दोन वेळा कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घ्यावा अशा सूचना दिल्या. या प्रसंगी अतिरिक्त शहर अभियंता श्री सचिन नाईक उपस्थित होते.

# कर थकबाकीमुळे शाळेच्या कार्यालयाला टाळे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : गेल्या ७ वर्षापासून १ कोटी २८ लाखांचा कर थकविणाऱ्या टिटवाळा येथील जी आर पाटील शाळेचे कार्यालय सील करण्याची कारवाई अ प्रभागाचे कर अधीक्षक जयराम शिंदे यांनी केली. शाळेचे कार्यालय सील करताच शाळा प्रशासनाची धांदल उडाली असून अनेक लोकप्रतिनिधीकडून कर विभागावर दबाव सुरु झाला आहे. मात्र जोपर्यंत कराचा भरणा केला जात नाही तोपर्यंत सील उघडले जाणार नसल्याच्या भूमिकेवर प्रशासन ठाम असल्याने शाळेच्या अडचणीत वाढ झाली आहे.




महापालिका प्रशासनाने कर विभागाला २०२५-२६ या आर्थिक वर्षात ७५० कोटी उत्पन्नाचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे. या उद्दिष्टाचा पाठलाग करताना आतापर्यंत पालिकेच्या तिजोरीत केवळ ३०० कोटीचे उत्पन्न गोळा होऊ शकले असून उर्वरित वसुलीसाठी प्रशासनाचा कर विभाग निवडणुकीच्या कामातून मुक्त होताच सक्रीय झाला आहे. थकबाकीदारांना नोटीसा देत आणि वसुलीसाठी धडक मोहीम राबविण्यास प्रशासनाने सुरुवात केली आहे. टिटवाळा येथील जी आर पाटील या अनधिकृत इमारतीत असलेल्या शाळेने मालमत्ता कर मागील अनेक वर्षापासून थकवला असून प्रशासनाकडून या शाळेला नोटीसा देत चालढकल केली जात असल्याने शाळेच्या मालमत्ता कराची थकबाकी १ कोटी २८ लाखावर पोचली आहे. दोन वर्षापूर्वी शाळेकडून ५७ लाखाचा कर भरणा करण्यात आला असला तरी थकबाकी पूर्णपणे भरणा केलेली नसल्याने या थकबाकीवर २४ टक्के दराने शास्ती आकारली जात आहे. परिणामी कर आणि थकबाकीची रक्कम १ कोटी २८ लाखावर पोचली आहे. या वसुलीसाठी प्रशासनाकडून नोटीसा पाठवण्यात आल्या असल्या तरी त्याकडे शाळा प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने मंगळवारी कर विभागाने शाळेवर कारवाई करत शाळेचे कार्यालय आणि स्टाफरूम सील केला आहे. प्रशासनाने कारवाई केल्यानंतर शाळा प्रशासन हवालदिल झाले असून लोकप्रतिनिधीनी देखील या कारवाईत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला मात्र कर विभागाच्या अधिकार्यांनी नकार दिला असून जोपर्यंत कारवाई रोखण्याचे आदेश आयुक्ताकडून प्राप्त होत नाहीत तोपर्यंत कारवाई सुरु राहणार असल्याची भूमिका घेतल्याचे शिंदे यांनी सांगितले. याबाबत शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या कांबळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी शाळेची इमारत अनधिकृत असली तरी त्याच्या रेग्युलायझेशनसाठीची प्रक्रिया सुरु आहे. थकबाकीच्या रकमेत १ कोटी हि शास्तीची रक्कम असून ही शास्ती कमी करण्यासाठी आपण प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहोत मात्र प्रशासनाकडून अभय योजना बंद झाल्याचे कारण देत शास्ती रद्द करण्यास नकार दिला आहे. शाळेत गरीब विद्यार्थी शिक्षण घेत असून शाळेची आर्थिक परिस्थिती इतका कर भरण्याची नसल्याने थकबाकी वाढली असून प्रशासनाने यात हस्तक्षेप करावा अशी मागणी केली आहे.

महाराष्ट्र शासन

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय तालुका-मुरबाड जिल्हा - ठाणे**

कार्यालयाचा पत्ताः एम.आय.डी.सी. प्लॉट क्र.१४ ता. मुरबाड जि.ठाणे पिन कोडः ४२१४०१
दूरध्वनी क्र. ०२५२४-२२२१९९ ई-मेलः tahmurbad1@gmail.com

**जाहिर नोटिस**

**प्रति,**
**१) श्रीअनिता लक्ष्मण सुरोशे**
**रा. नढई , ता.मुरबाड जि. ठाणे.............................(अर्जदार)**
**विरुद्ध**
**२) ग्रामपंचायत नढई**
**जन्म मृत्यु नोंदणी विभाग,**
**ता. मुरबाड, जि. ठाणे.........................................सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणेः

१. उपरोक्त अर्जदार यांचे पती कै. लक्ष्मण कृष्णा सुरोशे यांचा मृत्यु दिनांक 6/1/2016 रोजी राहत्या घरी मु.नढई ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म/ मृत्युची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म/ मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.
२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दाखल केला आहे.
३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे यांचे 1463 यांचा मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणे करीता आदेश करण्यात येईल.
आज दिनांक माहे 10/02/26 रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

शिक्का

**जा. क्र. फौजदारी/**
**जन्म मृत्यू नोंद**
**/कावि /२०२६**

**हुकुमावरुन**
**सही /-**
**(श्री. महादेव देशमुख)**
**सहाय्यक महसुल अधिकारी**
**मुरबाड**

# उल्हासनगरच्या महापौर अश्विनी निकम यांची पहिली आढावा बैठक ■ नागरी समस्यांवर भर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १०**

**उल्हासनगर** : नवनिर्वाचित महापौर अश्विनी कमलेश निकम यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आज आपली पहिली अधिकृत आढावा बैठक घेतली. महापालिका आयुक्त मनिषा अव्हाळे (भा.प्र.से.) यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच सर्व विभागप्रमुखांसोबत ही बैठक दुपारी ०१:०० वाजता स्थायी समिती सभागृहात पार पडली. बैठकीच्या सुरुवातीला सर्व विभागप्रमुखांनी स्वतःची ओळख करून देत आपल्या विभागाच्या कामकाजाची थोडक्यात माहिती सादर केली.

या बैठकीत शहरातील प्रमुख नागरी समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. भटकी कुत्री नियंत्रणासाठी डॉग सेंटर संदर्भातील उपाययोजना, शहरातील धूळ व प्रदूषण नियंत्रणाचे नियोजन, पाणी गळतीच्या तक्रारी तसेच रस्त्यांची दुरवस्था व दुरुस्ती कामांचा आढावा महापौरांनी घेतला. नागरिकांना मूलभूत सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे स्पष्ट निर्देश महापौर अश्विनी निकम यांनी दिले.

या आढावा बैठकीस अतिरिक्त आयुक्त किशोर गवस, भाजपचे गटनेते राजेश वधारीया, शिवसेनेचे गटनेते अरुण आशान, नगरसेवक जमनु पुरुस्वानी यांच्यासह महापालिकेचे सर्व उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




1. **भटकी कुत्री नियंत्रण, धूळ व प्रदूषण, पाणी गळती आणि रस्त्यांची दुरवस्था या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा.**
2. **नागरिकांना मूलभूत सुविधा प्रभावीपणे देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश.**
3. **बैठकीस आयुक्त मनिषा अव्हाळे, अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित.**

# हिंद दी चादर गुरु तेग बहादूर शहिदी वर्षानिमित्त आरोग्य शिबीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई** : 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी' यांच्या 350 व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त दि. 28 फेब्रुवारी व 01 मार्च 2026 रोजी खारघर, नवी मुंबई येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी मा .प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तसेच मा. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

शासनाचे निर्देशानुसार या कार्यक्रमाच्या जनजागृतीसाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फतही विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत महापालिकेची दोन रुग्णालय व 26 शहरी प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र यांच्यामार्फत उद्यापासून दिनांक 27 फेब्रुवारी 2026 पर्यंत विविध आरोग्य सेवा देण्याकरिता मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे सदर आरोग्य शिबिरांचा तपशील खालील प्रमाणे आहे तरी अधिकाधिक नागरिकांनी या आरोग्य शिबिरांचा लाभ घ्यावा असे आवाहन महापौर हर्षाली चौधरी व महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे मार्फत करण्यात येत आहे.

# मोबाईल दुकान चोरीप्रकरणी दोघांना अटक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी शहरातील कल्याण रोड परिसरातील मोबाईल दुकानात झालेल्या चोरीप्रकरणी शांतीनगर पोलिसांनी जलद तपास करत दोन चोरट्यांना अटक केली आहे. अटक आरोपींकडून १०८ मोबाईल, एक लॅपटॉप व इतर साहित्य असा एकूण सुमारे २३ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

६ फेब्रुवारी रोजी ही चोरी घडली होती. याप्रकरणी ८ फेब्रुवारी रोजी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपआयुक्त शशिकांत बोराटे व सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांच्या पथकाने तपास करून आरोपींना अटक केली. पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत शारदा इंग्लिश स्कूलची बाजी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**शहापूर ग्रामीण**

वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे ऑर्गनायझेशन आयोजित आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धा नुकतीच प्रियदर्शिनी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मुलुंड येथे पार पडली त्या स्पर्धेत शारदा इंग्लिश मिडीयम स्कुल वासिंदच्या हंसिका मारुती पाटील इ. 7 वी.12 वर्षे वयोगट 54 की वजन गटामध्ये सुवर्ण पदक मिळविले तर माविया मेमन हिने 48 की वजन गटामध्ये सुवर्ण पदक मिळविले तसेच धृती हालके हिने 35 कि वजन गट 12 वर्षे वयोगटात रौप्य पदक मिळविले यज्ञिका ठाकरे हिने 9 वर्षे वयोगटात रौप्य पदक मिळविले तसेच मृणाली शेलार हिने 8 वर्षे वयोगटा मध्ये कांस्य पदक मिळवून चमकदार कामगिरी केली आणि शाळेचे नाव लौकिक केले आहे या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक (कराटे प्रशिक्षक) दौलत चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले विद्या विकास मंडळाचे चेअरमन विठ्ठल सातवी सेक्रेटरी रविंद्र शेलार व सर्व संचालक, प्राचार्य प्रशांत जाधव, सरस्वती विद्यालयाचे प्राचार्य वासुदेव भोईर, पर्यवेक्षक काळूराम धनगर, संजीव जाधव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक करून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.




# रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत दिग्गजांना पराभवाचा धक्का

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत अनेक दिग्गज उमेदवारांना मतदारांनी जोरदार धक्का दिला. शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांचे पुत्र जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आस्वाद पाटील व सून जिल्हा परिषदेच्या माजी अर्थ व बांधकाम सभापती चित्रा पाटील या सध्या भाजपमध्ये दाखल झाल्या आहेत. चित्रा पाटील यांचा रसिका केणी यांनी पराभव केला. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांचे बंधू माजी आमदार पंडित पाटील हे भाजपमध्ये असून, पंडित पाटील यांचे पुत्र सुप्रभात पाटील यांचा अलिबाग तालुक्यातील शहापूर जिल्हा परिषद गटात पराभव झाला. अजित पवार गटाचे उमेदवार अमित नाईक यांनी येथे विजय मिळवला. भाजपचे राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांच्या पत्नी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा नीलिमा पाटील यांचा सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा गटात शर्मिला बोडके यांनी पराभव केला. भाजप आमदार रवींद्र पाटील यांची सून शर्मिला पाटील पेण तालुक्यातील शिहू गटातून निवडणुकीला सामोऱ्या गेल्या. त्यांना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उमेदवार पल्लवी भोईर यांनी पराभवाची धूळ चारली. तसेच जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती ॲड. राजीव साबळे यांना निजामपूर जिल्हा परिषद गटात अविनाश नलावडे यांच्याकडून पराभव सहन करावा लागला. शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या सून श्वेता थोरवे यांचा वेणगाव पंचायत समिती गणातून पराभव झाला. ऐन निवडणुकीच्या काळात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची साथ सोडून अजित पवार गटात गेलेले माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर जैन यांचा नागोठणे जिल्हा परिषद मतदारसंघात परिवर्तन आघाडीचे उमेदवार सुमित काटे यांनी पराभव केला. शिवसेनेशी प्रतारणा केलेल्या किशोर जैन यांना नागोठणेकरांनी कात्रजचा घाट दाखविला. जिपचे माजी सभापती शेकाप उमेदवार संजय जांभळे यांचा भाजपाचे प्रभाकर म्हात्रे (हरिओम) यांनी पराभव केला. अशा अनेक मातब्बर उमेदवारांचा पराभव झाल्यामुळे हा पराभव त्यांच्या जिव्हारी लागला असून आगामी निवडणुकीमध्ये ते निश्चितच याची दखल घेतील.

**जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा नीलिमा पाटील यांचा सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा गटात शर्मिला बोडके यांनी केला पराभव**

# महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंधासाठी अंतर्गत समिती सक्तीची

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : दहापेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत असलेल्या राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच खासगी आस्थापनांमध्ये महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंधासाठी 'अंतर्गत समिती' स्थापन करणे बंधनकारक असून, याचे पालन न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्त नयना गुंडे यांनी दिली आहे.अंतर्गत समिती स्थापन न केल्यास संबंधित मालक किंवा प्रमुखांवर ५० हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाऊ शकतो. जर ही चूक पुन्हा केली गेली, तर संबंधित आस्थापनाचा परवाना रद्द करणे किंवा दुप्पट दंड आकारण्यात येणार आहे. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या कठोर भूमिकेनुसार महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई आणि निवारण अधिनियम २०१३ (पॉश कायदा २०१३) ची प्रभावी अंमलबजावणी राज्यात राबविण्यात येत आहे. स्थापन केलेल्या अंतर्गत समितीची माहिती केंद्र सरकारच्या शी बॉक्स (shebox. wcd.gov.in) या ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. यामुळे तक्रारींचे निवारण आणि देखरेख सुलभ होण्यास मदत होणार आहे.पॉश (पीओएसएच) कायद्यानुसार, ज्या कार्यालयांमध्ये किंवा आस्थापनांमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, अशी सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कंपन्या, खासगी कंपन्या व उद्योग, स्वयंसेवी संस्था, ट्रस्ट, सोसायटी, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, व्यापारी, औद्योगिक, सेवा व वित्तीय क्षेत्रातील आस्थापने, क्रीडा संस्था, प्रेक्षागृहे, वितरण व विक्री केंद्रे आदिना संस्थांना अंतर्गत समिती स्थापन करणे अनिवार्य आहे.

# कल्याण मध्ये रंगणार दिग्गज कलाकारांचा पेशकार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण मधील नामवंत तबला वादक व गुरू कै वि.बा आलोणी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पेशकार हा कार्यक्रम शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी रोजी रात्री ८.४५ वा कल्याण येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे संपन्न होणार आहे. याचे आयोजन होरायजन इव्हेंटस् तर्फे नृत्य साधना यांच्या सहयोगाने करण्यात आले आहे. आत्तापर्यंत गेल्या काही वर्षात पंडित अनिंदो चॅटर्जी, ओजस अधिया, आदित्य कल्याणपूर, सत्यजीत तळवलकर, यशवंत वैष्णव, ईशान घोष, स्वप्नील भिसे यांसारख्या कलाकारांनी आपले तबलावादन पेशकार मध्ये सादर केले आहे.

यामध्ये पहिल्या सत्रात "आवर्तन" हा तबला वादक स्वप्नील भाटे यांच्या संकल्पनेतून साकार झालेला कार्यक्रम सादर होणार आहे. यात स्वतः स्वप्नील भाटे(तबला) यांच्यासह डॉ क्षमा कुलकर्णी (कथक), कौस्तुभ आपटे (गायन),सुधांशू घारपुरे(हार्मोनियम), राजू कुलकर्णी(ड्रम्स) प्रथमेश तारळकर (पखवाज), ईशान भट(पढंत) यांचा या कार्यक्रमात सहभाग असणार आहे. तसेच विशेष आकर्षण म्हणजे दुसऱ्या सत्रात सुप्रसिद्ध तबला वादक पद्मश्री विजय घाटे यांचे एकल तबला वादन सादर होणार आहे व त्यांना सुरंजन खांडळकर व अभिषेक सिनकर हे गायन व हार्मोनियम नगमा संगत करणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असणार आहे. असे असले तरीही प्रवेशिका आवश्य क असून त्या कल्याण गायन समाजाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. कार्यक्रमाच्या वेळी अत्रे रंगमंदिर येथेही मिळतील असे आयोजक प्रशांत दांडेकर यांनी सांगितले.

नेहमीप्रमाणेच तबला, कथकप्रेमी रसिक तसेच संगीत शिकणारे विद्यार्थी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहतील असा विश्वास होरायजनच्या स्वप्नील भाटे यांनी व्यक्त केला. अधिक माहिती साठी संपर्क प्रशांत दांडेकर 9820578298, स्वप्नील भाटे 9820232659




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024